महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक: सीटीटी-०९२०/सीआर-४६/२०१९/तीन दिनांक: ९ एप्रिल, २०२१

## -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय :-** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत
**संदर्भ :-** शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ-११२१/प्र.क्र.८५/का-८, दिनांक ९ एप्रिल, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी नियोजित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० च्या आयोजनासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक ९ एप्रिल, २०२१ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे :-

**"दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी आयोगामार्फत आयोजित होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात यावी तसेच कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभागाशी सल्लामसलत करुन परीक्षेची पुढील तारीख जाहीर करावी."**

**२.** शासनाकडून घेण्यात आलेल्या उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने विषयांकित महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२० ही पुढे ढकलण्यात येत आहे.

**३.** प्रस्तुत परीक्षेचा दिनांक यथावकाश जाहीर करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग